# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.02.2025** **वार:गुरुवार**

1. राज्यातल्या नदीजोड प्रकल्पांचं काम येत्या वर्षभरात सुरू करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
2. शाश्वत ग्रामविकासासाठी कृषी विद्यापीठांनी मध्यवर्ती भूमिका बजावण्याचं राज्यपालांचं आवाहन
3. औद्योगिक वापरासाठी बिगरशेती परवानगी आवश्यक नसल्याचं परिपत्रक जारी
4. राज्यातील 16 कृषी उत्पन्न बाजार समित्या ई-नामसोबत जोडण्याचं नियोजन आणि
5. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत राज्यात 18 वर्षांखालील 98 लाख मुलांची तपासणी, 2 हजार 164 बालकांवर मोफत हृदय शस्त्रक्रिया

**मुख्यमंत्री-बीड**

राज्यातल्या चार नदीजोड प्रकल्पांचं काम येत्या वर्षभरात सुरू करण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यातल्या खुंटेफळ इथं आष्टी उपसा सिंचन योजनेच्या कामाचं भूमिपूजन करताना ते काल बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह अन्य मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते.

मराठवाड्याला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करायचं असेल तर पश्चिमवाहिनी नद्यांचं पाणी गोदावरी खोऱ्यात आणणं महत्त्वाचं आहे असं सांगताना मुख्यमंत्री म्हणाले.....

खुंटेफळ सिंचन तलावासाठी शेतजमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मोबदल्याचा धनादेश प्रदान करण्यात आला. याशिवाय, भारताला खो-खो मधला पहिला विश्वचषक मिळवून देणाऱ्या भारतीय महिला खो-खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे आणि संघातले खेळाडू, प्रशिक्षक यांचा फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**राज्यपाल-अकोला**

कृषीप्रधान संस्कृती आणि सर्वाधिक लोकसंख्यांक लोकशाही जपण्याची सामूहिक जबाबदारी सर्वच क्षेत्रांची असली तरी सर्वाधिक टक्का असणाऱ्या कृषी क्षेत्रावर आणि पर्यायानं कृषी पदवीधरांवर ती जास्त आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी केलं आहे. ते काल अकोला इथं डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या 39 व्या दीक्षांत समारंभात बोलत होते. शाश्वत ग्रामविकासासाठी कृषी विद्यापीठांनी मध्यवर्ती भूमिका बजावावी, असं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं. मातीचा पोत सुधारणं, चांगलं बी-बियाणं, वाण शोधाणं, पाण्याचा काटकसरीनं वापर, तसंच जलपुनर्भरणाच्या क्षेत्रात काम करणं यावर लक्ष देणं गरजेचं आहे, असं राज्यपाल म्हणाले.

**एनए**

औद्योगिक वापरासाठी एनए म्हणजे बिगरशेती परवानगी आवश्यक असणार नाही, याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत बदल करण्यात येणार आहे असं परिपत्रक महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढलं आहे. उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्या व्यापार सुलभता या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी जमीनधारकांना औद्योगिक वापरासाठी मानीव अकृषिक वापराची परवानगी घेण्यासाठी लागणारा वेळ जमीन एनए करण्यासाठी लागणाऱ्या वेळेएवढाच आहे, हे निदर्शनास आल्यानं हा निर्णय घेण्यात आला आहे.

**उपमुख्यमंत्री-अजित पवार**

केंद्र आणि राज्य शासनाच्या अक्षय ऊर्जा निर्मिती संदर्भात सर्व जिल्ह्यांनी सकारात्मकतेनं काम करावं अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. जिल्ह्याच्या वार्षिक आराखड्यामध्ये शाळा, कार्यालयांच्या सौर ऊर्जेसंदर्भातल्या प्रस्तावाचा समावेश करावा, असंही त्यांनी सांगितलं. सर्व जिल्ह्यांच्या वार्षिक योजनेसंदर्भात काल मुंबईत झालेल्या राज्यस्तरीय ई बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला उपस्थित लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांबाबतचे प्रस्ताव सादर केले.

**उपमुख्यमंत्री- एकनाथ शिंदे**

कोकण विभागातील म्हाडाच्या सदनिका आणि भूखंड विक्रीची संगणकीय सोडत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल ठाणे इथं काढण्यात आली. यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात लाभार्थ्यांना घरांचं वाटप करण्यात आलं.

**पणनमंत्री**

राज्यातील 16 कृषी उत्पन्न बाजार समित्या ई- नामशी जोडून आधुनिक तंत्रज्ञानानं त्या अद्ययावत ठेवल्या जाणार असल्याचं पणन मंत्री जयकुमार रावल यांनी काल पुण्यात सांगितलं. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र राज्य काजू मंडळाच्या संचालक मंडळाची बैठक रावल यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते. कृषी पणन मंडळाची कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडील थकीत कर्जवसुलीबाबत कार्यवाही करावी, कृषी पणन मंडळाच्या ताब्यातील जागेचा पुरेपूर उपयोग करावा, कृषी पणन मंडळात प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करावी, याकरता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासोबतच तज्ज्ञ सल्लागाराची मदत घ्यावी, अशा सूचनाही रावल यांनी यावेळी दिल्या.

**ग्रंथोत्सव**

विविध विषयांतील माहिती आणि ज्ञान मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपली वाचनकक्षा रुंदावावी, असं आवाहन विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी केलं. मुंबई शहर ग्रंथोत्सवाचं उद्घाटन काल डॉक्टर गोऱ्हे आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं त्यावेळी त्या बोलत होत्या. केवळ मोबाईलवर गुंतून न राहता रोज काहीतरी वाचन करा, समाजमाध्यमावर व्यक्त होताना कायद्याच्या चौकटीत राहून लिहिण्याचा प्रयत्न करा, चांगल्या लेखनाचा अनुभव घ्या असा सल्ला डॉक्टर गोऱ्हे यांनी विद्यार्थ्यांना दिला. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचं ग्रंथालय संचालनालय, मुंबई शहर जिल्हा ग्रंथालय अधिकारी आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांनी हा ग्रंथोत्सव आयोजित केला आहे.

**मुख्यमंत्री गडचिरोली**

गडचिरोली जिल्हा मलेरियामुक्त करण्यासाठी डॉक्टर अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील कृती दलानं सादर केलेल्या आराखड्याची येत्या 1 एप्रिलपासून अंमलबजावणी केली जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. यासाठी आदिवासी विभागामार्फत 25 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्याची माहिती त्यांनी दिली.

**तपासणी-पुणे, सांगली**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत गेल्या वर्षी एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत राज्यातील 70 हजार शाळांमधील 18 वर्षे वयापर्यंतच्या 98 लाख मुलांची तपासणी करण्यात आली. यापैकी 2 हजार 164 बालकांवर मोफत हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या. जन्मत: असलेलं व्यंग, जीवनसत्वांच्या कमतरतेमुळं होणारे आजार आणि इतर अपंगत्व इत्यादींचं वेळेवर निदान करून त्यांच्यावर योग्य उपचार करण्याचं उद्दिष्ट या कार्यक्रमात निश्चित केलं आहे. राज्यातील 18 वर्षांपर्यंतच्या साधारण 2 कोटी मुलांना या कार्यक्रमाचा लाभ होत आहे. अंगणवाडी स्तरावर 6 वर्षांपर्यंतच्या मुलांची वर्षातून दोनदा होणारी आरोग्य तपासणी हा कार्यक्रमाचा महत्त्वाचा घटक आहे, अशी माहिती पुणे सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे देण्यात आली आहे. राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत एकंदर 1196 पथकं मंजूर करण्यात आली आहेत.

दरम्यान, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सांगली जिल्ह्यातल्या अत्यंत गुंतागुंतीच्या हृदय शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या 22 बालकांना मोफत शस्त्रक्रियेकरता काल सांगलीतून मुंबईतल्या विविध रुग्णालयांमध्ये पाठवण्यात आलं. या बालकांना मोफत प्रवास, निवास आणि भोजन व्यवस्था दिली जाणार आहे. महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी तसंच अन्य संस्था आणि दानशूर व्यक्तींकडून उपलब्ध अनुदानातून या शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये गेल्यावर्षी डिसेंबरअखेर पुणे जिल्हा राज्यात अग्रस्थानी असून सांगली जिल्हा द्वितीय स्थानी आहे.

**क्रीडामंत्री**

क्रीडा विभागाचं कामकाज अधिक वेगानं होण्यासाठी एकात्मिक संगणक प्रणाली विकसित करण्याचे निर्देश राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल दिले. यासंदर्भात मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. अशी प्रणाली विकसित झाल्यावर खेळाडूंना योजनांचा लाभ वेळेत मिळेल. स्पर्धा आणि खेळाडूंच्या कामगिरीचा तपशील या एकत्रित प्रणाली अंतर्गत जतन करता येईल असं भरणे यांनी सांगितलं.

**मुदतवाढ मागणी-परभणी**

परभणी जिल्ह्यात नाफेडमार्फत होणाऱ्या सोयाबीन खरेदीसाठी 20 ते 25 दिवस मुदतवाढ द्यावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं केली आहे. आजपासून सरकारी खरेदी बंद होणार आहे मात्र नोंदणी केलेल्या 5 हजार 176 शेतकऱ्यांच्या सोयाबिनची खरेदी अजूनही झालेली नाही. मुदतीच्या काळात पोत्यांभावी 20 ते 25 दिवस सोयबीन खरेदी बंद होती. सर्व खरेदी होईपर्यंत सोयाबीन खरेदी केंद्र सुरू ठेवावीत, खरेदी केंद्रांची संख्या वाढवावी अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही केली आहे.

**निधन**

वारकरी संप्रदायातील वैचारिक नेतृत्व आणि संत तुकाराम महारांजांचे वंशज हभप शिरीष महाराज मोरे यांचं काल आकस्मिक निधन झालं. ते 30 वर्षांचे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोरे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करुन श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड दरम्यान पन्नास षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला पहिला क्रिकेट सामना आज नागपूरमधल्या विदर्भ क्रिकेट संघटनेच्या मैदानावर खेळवला जाईल. हा सामना दुपारी दीड वाजता सुरू होईल. या मालिकेतला दुसरा सामना येत्या रविवारी ओडिशामधल्या कटकमध्ये तर शेवटचा सामना 12 फेब्रुवारीला अहमदाबादमध्ये होणार आहे.

**हवामान**

राज्यात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.